महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय
जिल्हा उद्योग केंद्र, बुलडाणा

**जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (DEPC) बैठक दिनांक १३/०८/२०२४ चे इतिवृत्त.**

जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (DEPC) ची बैठक दिनांक **१३/०८/२०२४** रोजी दुपारी ५.३० वाजता मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील समितीचे सदस्य हजर होते.

| अ.क्र. | उपस्थित सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. किरण पाटील (भाप्रसे) | अध्यक्ष, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती, तथा जिल्हाधिकारी,बुलडाणा. |
| २ | कु.स्नेहल वी ढोके | महानिदेशक विदेश व्यापार,अपर महानिदेशक विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपुर लिंकद्वारे |
| ३ | श्री.अंकित गुप्ता | CA EY टिम लिंकद्वारे |
| ४ | श्री.प्रमोद लांडे | सचिव, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती, तथा महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,बुलडाणा. |
| ५ | श्री.सुनिल गो.पाटील | व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र,बुलढाणा. |
| ६ | श्री.पी.जी.काठोळे | निरीक्षक जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी,बुलढाणा. |
| ७ | श्री. मयुर लोणकर | असिस्टंट जिल्हा अग्रणी बँक (LDM) बुलडाणा. |
| ८ | श्री.एस.एस.चौरपगार | गृहपाल,आयटीडीपी,अकोला |
| ९ | श्री.रमेश करगकर | SBI RBO बुलढाणा. |
| १० | श्री.अमोल शिरसागर | SBI RBO बुलढाणा. |
| ११ | श्री.अे.वी.महाले | शाखा व्यवस्थापक,विदर्भ कोकण ग्रामीण बँक,बुलढाणा |
| १२ | श्री.राजेश मंदन | शाखा व्यवस्थापक,आयडीबीआय,बुलढाणा. |
| १३ | श्री.चेतन वानखडे | शाखा व्यवस्थापक,बँक ऑफ महाराष्ट्र,बुलढाणा. |
| १४ | श्री.राहुल शेंबेकर | शाखा व्यवस्थापक,इंडियन ओवरसीस बँक,बुलढाणा. |
| १५ | श्री.रविंद्र चोपडे | शाखा व्यवस्थापक |
| १६ | श्री.एन.एस.पाटील | व्यवस्थापक,जिउके बुलढाणा |

मा.अध्यक्षांच्या परवानगीने महाव्यवस्थापक,जिउके बुलढाणा यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

१. मा.अध्यक्षांनी बैठकीत सांगितले की, बुलढाणा जिल्हा हा अमरावती विभागात निर्यातीमध्ये प्रथम क्रमांकावर आहे. जिल्हयाचे सन २३-२४ एकुण निर्यात ही ८४१ कोटी इतकी आहे. जिल्हयात कापुस,ऑरगॅनिग केमिकल्स, साबण हे प्रमुख निर्यात होणारे उत्पादने आहेत. तसेच जिल्हयातुन बाग्लादेश,निदरलॅड,युके,सिंगापूर,अरब अमरात,युएसए,ब्राझील यासारख्या देशांमध्ये निर्यात होते.

२. मा.अध्यक्षांनी सांगितले की,बुलढाणा जिल्हा कृषिप्रधान असुन कापुस सोयाबीन व मका हे प्रमुख पिक आहे.जिल्यात सोयाबीन चे उत्पादन हे देशाच्या उत्पादनापेक्षा अधिक आहे. जिल्हयात उदयोगाला लागणारा कच्चा माल मोठया प्रमाणात उत्पादीत होतो परंतु कृषि प्रक्रिया व अन्न प्रकिया उदयोग मोठयाप्रमाणात नसल्याने निर्यात होत नाही. कृषि विभागाने शेतकरी गट.फार्मर प्रोडयुसिंग कंपनीची बैठक घेऊन पांढरी मुसळ ला जीआय मांनाकनाची मिळण्याची प्रक्रिया सुरु करावी.

तहसिल कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा.
दुरध्वनी क्रमांक 07262-295564 E-Mail didic.buldhana@maharashtra.gov.in

३. जिल्हा निर्यात कक्ष हे जिल्हा उद्योग केंद्र येथे स्थापन करण्यात आले आहे. या कक्षात निर्याताशी संबंधित कागदपत्रे,परवाने तसेच भौगोलिक (GI) मानांकनासाठी संबंधीची माहिती उदयोजकांना देण्यात येईल. त्याकरीता जिउके कार्यालयातील कर्मचा-यांना पहिले प्रशिक्षण हे (DGFT) नागपुर,ॲपेडा तसेच निर्याताशी संबंधित यंत्रणांनी दिले आहे असे मा.अध्यक्षांनी सांगितले.तसेच याबाबतचे प्रशिक्षण पुन्हा आयोजित करावे अशा सूचना मा.अध्यक्षांनी (DGFT) नागपुर यांना दिल्या.

४. कु.स्नेहल वी ढोके,महानिदेशक विदेश व्यापार,अपर महानिदेशक विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपुर यांनी जिल्हयाचा निर्यात आराखडयामध्ये काही बदल करणेबाबत श्री.अंकित गुप्ता यांना सूचना दिल्या.

५. जिल्हयात महाराष्ट्र औदयोगिक समुह योजनेअंतर्गत ६ औदयोगिक समुह स्थापित झाले आहेत. प्रत्येक तालुक्यात २ क्लस्टर स्थापित करण्याकरीता,माविम,एमएसआरएलएम,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा व कृषि विभागाने संभाव्य औदयोगिक समुहाची निवड करुन विहित नमुन्यातील माहीती जिल्हा उदयोग केंद्र कार्यालयास पुढील कार्यवाहीकरीता दयावी अशा सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या.

६. मा.अध्यक्षांनी सांगितले की, एसबीआय बँकेंने जिल्हयात विदेशी चलनातील व्यवहारासाठी MIDC चिखली व बुलढाणा येथे शाखा स्थापित करणेबाबत प्रस्ताव बँकेचे मुख्यालयास सादर केला आहे तसेच बँक ऑफ महाराष्ट्र देखील प्रस्ताव सादर करणार आहे.

७. टाऊन ऑफ एक्पोर्ट एक्सलन्स दर्जा बुलढाणा जिल्हयास मिळणेबाबत विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपुर यांनी कार्यवाही करावी तसेच जिल्हयात निर्यातदार व आयातदारांची बैठक आयोजित करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

८. जिल्हयातील उत्पादनांना भौगोलिक (GI) मानांकनासाठी प्रक्रिया/मार्गदर्शन मिळणेकरीता कार्यशाळा विदेश व्यापार कार्यालय (DGFT) नागपुर यांनी आयोजित करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

९. जिल्हयात उदयोजकांना कुशल कामगारांची गरज असल्याने होटेल मॅनेजमेंट व अकाऊंट जिएसटी यासारख्या प्रशिक्षण हे जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण विभाग,जिल्हा कौशल्य व विकास विभागाने नियोजन करावे असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले.तसेच जिल्हयाची सन २०२४-२५ मध्ये १५०० कोटीची निर्यातीचे लक्ष मा.अध्यक्षांनी दिले.

महाव्यवस्थापक यांनी उपस्थितांचे आभार मानुन, अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,बुलडाणा
तथा सचिव, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती,

जिल्हाधिकारी,बुलडाणा
तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती,